# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२

Ph. :0253-2231714,15 Ext 2002 http://-ycmou.digitaluniversity.ac

e-mail : mwkchair@ycmou.ac.in, sanwad@ycmou.ac.in

महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**प्रेषक** : प्रा.विजयकुमार पाईकराव

**विषय** : अभ्यासकेंद्र समंत्रकासाठी अनुभव लेखन स्पर्धा प्रसिद्धीबाबत...

**प्रति** : मा. जनसंपर्क अधिकारी

**दिनांक** : १३/०७/२०२३

अनेक अभ्यासकेंद्रावरील समंत्रक आपल्या विद्यापीठाच्या पाठ्यपुस्तकाचा, यशवाणी वेब रेडिओचा आणि मुक्त विद्यापीठ संवाद पत्रिकेचा शैक्षणिक साहित्य म्हणून अध्यायनार्थींशी समंत्रण, चर्चा व मार्गदर्शन करण्याचे साधन म्हणून वापरतात. ते कसे वापरले जाते हे समजून घेण्यासाठी आपल्या विद्यापीठाच्या सर्व अभ्यासकेंद्रावरील समंत्रकासाठी **"मी पाठ्यपुस्तके, संवाद पत्रिका व माझे अध्ययनार्थी"** या विषयावर ही खास स्पर्धा आयोजित केली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे, त्यास विविध माध्यमात प्रसिद्धी द्यावी. ही विनंती, आदर व आभारासह.

## ॥ सर्व शिक्षणक्रमाच्या संमंत्रक व समन्वयकांना आपले अनुभव लेखनाची सुसंधी ॥

१. पाठ्यपुस्तके संवाद पत्रिका, यशवाणी वेब रेडीओ इ. साहित्याचा वापर तुम्ही अध्ययनार्थीना संमंत्रण करण्यासाठी, मार्गदशन व चर्चा करण्यासाठी कसा वापर केला त्याचा अनुभव लिहून पाठवणे आपेक्षित आहे.

२. ही स्पर्धा सर्व विद्याशाखेच्या समंत्रकासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यमातून आयोजित आहे.

३. अनुभवलेख जास्तीत जास्त ८०० शब्दांत असावा. (कमीत कमी कितीही शब्द चालेल)

४. अनुभव लेख पाठवतांना त्याच्या सोबत समंत्रकांनी आपले नाव, पत्ता, भ्रमणध्वनी, अभ्यासकेंद्राचे नाव, शिक्षणकर्माचे नाव, कोणत्या विषयाचे समंत्रणकरता त्याचे नाव, ईमेल इ. तपशील पाठवणे आपेक्षित आहे.

५. लेख ईमेल sanwad@ycmou.ac.in किंवा हाताने लिहून टपालाने प्रा. विजयकुमार पाईकराव कार्यकारी संपादक संवाद पत्रिका, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२२२२.या पत्त्यावर दि. १७ ऑगस्ट २०२३ पर्यंत पाठवावा.

६. विभागवार पहिल्या ८ स्पर्धकांना रुपये एक हजार रोख आणि प्रमाणपत्र दिले जाईल, शिवाय संवाद पत्रिका मासिकात प्रसिद्धी मिळेल. तसेच गुणवत्ता प्रमाणपत्रे सर्व सहभागी स्पर्धकांना दिले जातील.

तरी जास्तीत जास्त समंत्रकांनी आपले अनुभव लिहून पाठवावेत.

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन
आणि कार्यकारी संपादक, संवाद पत्रिका